# मुलीचा बळी: कायदा, सत्तेची लालसा आणि समाजमनाचा आरसा

मयुरी लाड

नांदेडमध्ये अलीकडेच घडलेली घटना मन सुन्न करणारी आहे. सरपंच होण्यासाठी मार्ग मोकळा व्हावा म्हणून एका बापाने स्वतःच्या मुलीचा खून केल्याचा आरोप समोर आला आहे. ही केवळ एक गुन्हेगारी घटना नाही; ती आपल्या राजकीय व्यवस्थेचा, कायद्यांच्या परिणामांचा आणि समाजाच्या विकृत मानसिकतेचा आरसा आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये दोनपेक्षा अधिक अपत्ये असलेल्या व्यक्तींना निवडणूक लढवण्यास अपात्र ठरवणाऱ्या कायद्याला सर्वोच्च न्यायालयाने २००३ मध्ये मान्यता दिली. या निकालपत्रात असे म्हटले होते की, अशी बंदी आणण्याने निवडणूक लढवण्याच्या मूलभूत नागरी हक्कांवर कोणत्याही प्रकारे गदा येत नाही. व्यापक देशहिताच्या भूमिकेतून हा कायदा समर्थनीय आहे.

हा कायदा केवळ ग्रामपंचायतींना लागू आहे मात्र प्रत्यक्षात या कायद्याचा परिणाम कोणावर होतो? हा नियम आमदार, खासदार किंवा शहरी राजकारण्यांना लागू नाही. तो फक्त ग्रामपंचायतीपुरता मर्यादित आहे. त्यामुळे त्याचा सर्वाधिक फटका बसतो तो ग्रामीण, गरीब, दलित, आदिवासी आणि नव्याने राजकारणात आलेल्या घटकांना. तथापि, लोकशाही विकेंद्रीकरण, सामाजिक न्याय या भूमिकेतून पंचायती राजला दिलेले महत्त्व, स्त्रिया, दलित, आदिवासींना दिलेले आरक्षण यासारख्या सकारात्मक तरतुदींना छेद देण्याचे काम या निकालपत्राने साधले आहे, हे निश्चित. सर्वोच्च न्यायालयाने शिक्कामोर्तब केलेल्या या धोरणाचा रोख लोकसंख्या नियंत्रणावर आहे की लोक नियंत्रणावर?

हरियाणामध्ये हा कायदा लागू केल्यानंतर कोणाकोणाला पदावरून हटवले गेले याची वस्तुस्थिती काही अभ्यासातून पुढे आलेली आहे. गरीब व सामाजिकदृष्ट्या वंचित घटकांतील आणि आरक्षणामुळे प्रथमच लोकप्रतिनिधीपदावर आलेल्या समूहांवर, त्यातील स्त्रियांवर या कायद्याची कुऱ्हाड कोसळली आहे. माहितीचा अभाव असलेल्या मागासलेल्या समाजात मुलांचं प्रमाण जास्त आहे, ही सामाजिक वस्तुस्थिती व त्या मागची अनेकविध कारणे लक्षात घेता, हा कायदा कसा त्यांच्याविरोधी आहे, हे सहज लक्षात येते.

**नव्या प्रश्नांना जन्म देणारे धोरण**

या कायद्याच्या अंमलामुळे हरियाणा, मध्य प्रदेश व राजस्थानमध्ये स्त्रियांना वेगळ्याच विषमतेला तोंड द्यावे लागत आहे. पुरुषांनी आपले पद जाऊ नये म्हणून आपल्या बायकोला फारकत् दिली आहे. मुलगाच हवा या अट्टाहासापोटी बाईला वारंवार बाळंतपणाच्या चक्रातून जावे लागते. अनेक मुलं जन्माला येतात. मग मुलं तर मर्यादित हवीत! मग लिंगनिदान चाचणी करून मुलग्याचा गर्भ ठेवायचा व मुलीचा पाडायचा. या घटना वाढल्या आहेत. या राज्यातील मुलगा-मुलगी यांच्या प्रमाणातील वाढता असमतोल या प्रकारच्या घटनांची साक्ष देतो. काही वेळा त्यांना चक्क वाऱ्यावर सोडून दिले जाते. कायद्यातून काढल्या जाणाऱ्या पळवाटा नव्या समस्यांना जन्म देणाऱ्या आणि रोगापेक्षा इलाज जालीम अशाच आहेत.

पण मुळात रोग काय आहे? वाढती लोकसंख्या हा सामाजिक रोग आहे असे मांडले जाते. लोकं जास्त संसाधनं कमी म्हणून भारताचा विकास होत नाही हे एक लोकप्रिय विधान आहे. गरिबीचं मोठं प्रमाण आणि विकास न होण्याचं मूळ वाढत्या लोकसंख्येत आहे, त्यामुळे कोणत्याही पद्धतीनं का होईना आळा घातला पाहिजे. गरिबीचं मूळ कारण काय? संसाधनांची कमतरता की संसाधनांचं विषम वाटप? हा मूलभूत प्रश्न आहे. गरीब, कष्टकरी, अंगमेहनती समाजाकडे अन्य संसाधने नसतात, त्यांची मुलं हीच त्यांची संसाधनं असतात. त्यांना मुलं जास्त होण्याचं हे एक कारण. दुसरं म्हणजे बालमृत्यू, नवजात बालमृत्यूचं प्रमाणही या वर्गात अधिक आहे. झालेलं मूल जगेल, त्यांच्या आजारपणात योग्य वेळी उपचार मिळेल, त्याचं दवापाणी करता येईल, त्याचं भरणपोषण व्यवस्थित होईल याची खात्री हातावरचं पोट असलेल्या लोकांकडे कशी असणार? त्यामुळे आर्थिक विकास, खात्रीशीरपणे मिळणारी आरोग्य सेवा यांची तजवीज झाली तर त्याचा परिणाम कालांतराने कुटुंब मर्यादित राखण्याकडे होणार आहे, हे अनेक अनुभवांवरून स्पष्ट झालेले आहे. लोकसंख्यावाढीचं एकमेव कारण वाढता जन्मदर हे नाही, तर वाढतं आयुर्मान हेही आहे. हे तर जनगणनेतून स्पष्टपणे पुढे आले आहे.

**प्रजननाच्या निर्णयात बाईचा सहभाग कमीच**

हे सामाजिक वास्तव आणि न्यायालयाचा या वास्तवाकडे बघण्याचा दृष्टिकोन यात अंतर आहे. याच निकालपत्रात म्हटलं आहे की, भारतीय स्त्रियांमध्ये आता जागरूकता वाढत आहे. त्यामुळे इच्छा नसताना मूल व्हावं असा दबाव (पान ५७ वर »)